RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ६, अंक ५६] गुरुवार, डिसेंबर ३१, २०२०/पौष १०, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ९४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उपजिभूक्र. ७/भूसं./मुंउजि/एलएक्यू ८४३/२०२०.—मौजे मालाड तालुका बोरीवली जिल्हा मुंबई उपनगर येथील "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३" अंतर्गत न.भू.क्र. ८२७ भाग स क्र. २३९ भाग चे भूसंपादन ;

ज्याअर्थी, प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला असून प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही करणेकरिता जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजीचे आदेशान्वये उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७ यांना प्राधिकृत केले आहे. प्रकरणी कलम ११ ची अधिसूचना दिनांक २५-३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी व कलम १९(१) ची अधिसूचना दिनांक ११ जानेवारी २०१९ रोजी प्रसिद्ध करणेत आली ;

ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणी विहित मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांची खात्री झाल्याने भूमिसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम २५ अन्वये अधिसूचना **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध करणेत येऊन निवाडा घोषित करण्याच्या कालावधीत १२ महिन्यांची वाढ यापूर्वी मंजूर करण्यात आली आहे ;

ज्याअर्थी, उप जिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ७ यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार करोना महामारीमुळे झालेली प्रशासकीय विलंब, मा. उच्च न्यायालयात बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादनाखालील जमिनीच्या क्षेत्राबाबत दाखल केलेली Notice of Motion (L) No. 103/2019 व Review Petition (L) No. 41/2019 तसेच हितसंबंधितांनी संपादनाखालील क्षेत्राबाबत नोंदविलेला आक्षेप व मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली Writ Petition (L) No. 6042/2020 या अद्याप निर्णित झालेल्या नसलेने अंतिम निवाडा घोषित करणे उचित होणार नाही. त्यामुळे सद्यस्थितीत मुदतवाढ न दिल्यास संपादनाची संपूर्ण प्रक्रिया संपुष्टात येईल ;

आणि ज्याअर्थी, कलम १९ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने उपरोक्त कलम २५ च्या अधिसूचनेद्वारे वाढीव १२ (बारा) महिन्यांच्या कालावधीत निवाडा घोषित करणेस झालेल्या विलंबास समर्थन करणारी परिस्थिती असून सदर मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, या नात्याने प्रकरणात १२ महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरून खालील प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्यास दिनांक ११ जानेवारी २०२१ पासून (सहा) महिन्यांची वाढीव मुदत मंजूर करत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

मौजे मालाड, तालुका बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर

| अ. क्र. | न. भू. क्र. | स. क्र. | कलम १९(१) चे दिनांक २९ ऑगस्ट २०२० रोजीचे शुद्धीपत्रकानुसार अधिसूचित केलेले क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ८२७अ | २३९ पै | १,४२,८२३.८० |

**संपादनाचे प्रयोजन.**—पुनर्वसन व पुनर्स्थापन, २-महानगरपालिका शाळा व विकास नियोजन रस्तेकरिता भूसंपादन.

मुंबई,
दिनांक ३१ डिसेंबर २०२०.

**मिलिंद बोरीकर,**
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.